OK (२०)

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२०१२

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :
प्रकरण बंद केल्याची तारीख : मुळप्रत

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | प्रकरण क्र. १०३ ते १०६ |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०३/०१/२०१२.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- २० दिनांक ०३/०१/२०१२**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ०७/०१/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २०, दि. ०३/०१/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक २०, दि. ०३/०१/२०१२ सोबतची विषय पत्रिका**
**सभा शनिवार दि. ०७/०१/२०१२**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| १०३ | १२/१२/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** – निरंक |
| --- | **विनंती अर्ज** – निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** |
| १०४ | खारीगांव (बंदरवाडी) स्मशानभूमी देखभाल व दुरुस्ती करणेस मे. परहीत सेवा संघ यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे. |
| १०५ | निवीदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १०६ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

**दिनांक :- ०३/०१/२०१२.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका



८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा सुचना क्रमांक २०, दि. २९/१२/२०११ सोबतची विषय पत्रिका
सभा शुक्रवार दि. ०६/०१/२०१२

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| १०३ | १२/१२/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** – निरंक |
| --- | **विनंती अर्ज** – निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** |
| १०४ | खारीगांव (बंदरवाडी) स्मशानभूमी देखभाल व दुरुस्ती करणेस मे. परहीत सेवा संघ यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे. |
| १०५ | पाणी पुरवठा विभागाचा आढावा घेणे. |
| १०६ | निवीदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १०७ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

दिनांक :- २९/१२/२०११.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\Backup 02\1 D\01 My Document\01 Nagar Sachiv\01 Vishay Patrika\02 Vishay Patrika - Standing 2007 - 2012\Vishay Patrika 2011-12.doc

# मा. स्थायी समिती सभा

# दि. १२/१२/२०११

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १२/१२/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १२/१२/२०११ रोजी सभा सुचना क्र. १८ दि. ०५/१२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ५. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ९. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |
| १२. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १३. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १४. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १५. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १६. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**गैरहजर सदस्य - निरंक**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १२/१२/२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १८, दि. ०५/१२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९२, त्रैमासिक जमा-खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०११-१२ चे मंजूर अंदाज पत्रकानुसार माहे १ जुलै २०११ ते ३० सप्टेंबर अखेर अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेली प्रत्यक्ष जमा व त्याप्रमाणात झालेला प्रत्यक्ष खर्च ह्याबाबतचे त्रैमासिक लेखे अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले आहेत.

त्रैमासिक जमा खर्चाचा सर्व विभागवार आढावा घेतला असता असे दिसून येते की, जमा बाजू मध्ये अंदाज पत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त रक्कम जमा होण्याची शक्यता आहे. उदा. स्थानिक संस्था कराचे सध्या जमा झालेली रक्कम लक्षात घेता अपेक्षित उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न मार्च २०१२ अखेरपर्यंत होणार आहे. तसेच अंदाज पत्रकात विविध लेखाशिर्षाखाली विकास कामांसाठी तरतुद करण्यात आलेल्या खर्चाच्या रक्कमा सदर कामांच्या प्रक्रियेस अद्याप सुरुवात देखील न झाल्याने सदर लेखाशिर्षातील रक्कमा मार्च २०१२ अखेर पर्यंत अखर्चित राहणार आहेत.

तरी प्रशासनाने वरील बाबींचा पडताळा करुन अखर्चित राहू शकणाऱ्या तरतुदींची रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ नुसार पुर्नविनियोजन करुन अन्य आवश्यक विकास कामांसाठी उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजुरी करीता ठेवावा त्यासह ही सभा त्रैमासिक जमा खर्चास मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, महानगरपालिकेतील दर व कर, सर्वसाधारण किंवा मालमत्ता कर, आपल्याला ६५ करोड रु. जमा करायचे आहे. पण, प्रशासनातर्फे फक्त ५ कोटी रु. जमलेले आहे. आणि आपल्याला ६० कोटी रु. जमवायचे आहेत. प्रशासनाने का चालढकल केली या बद्दल प्रशासनाने निवेदन केल तर बर होईल. कारण हे पैसे ६ महिन्याने येणार आहे का? त्याच्यामध्ये प्रशासनाला बाहेर जायला लागते. आणि त्याच्यामुळे बराच वेळ वाया जातो. तर प्रशासनातर्फे कारवाई काय करणार? आणि हे पैसे जमा व्हायला विलंब लागेल. आपण प्रत्येकावर जप्तीच वॉरन्ट आणतो. कोणावर सिल ठोकतो. अशी का परिस्थिती येते. प्रशासन त्याच्यासाठी काय करते? त्याचा प्रशासनाने खुलासा केला तर बर होईल. कारण ६ महिने पूर्ण झालेले आहे. तर प्रशासनाने त्याच्याबद्दल खुलासा करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती महोदयाच्या परवानगीने बोलतो, साहेब टॅक्स डिपार्टमेंटची बिल काढली. बिल काढल्यानंतर नोटिसही दिल्या आहेत. मॅक्झीमम वसुली डिसेंबर-जानेवारी-फेब्रुवारी नंतर होते. आणि दरवर्षी प्रमाणे आपले ७० ते ८० % वसुली होते. यावर्षी पण तेवढी होईल.

**शशिकांत भोईर :-**

तुम्हाला शेवटच्या क्षणात कशाला नळ कनेक्शन कापल्यानंतर नागरिक आमच्याकडे आले पाहिजे का? की नळ कनेक्शन कापले. आमच्या घराला सिल ठोकली. आम्हाला जप्ती वॉरन्ट दिलेलं आहे. ही परिस्थिती तुम्ही का आणता? हयाच्यासाठी प्रशासन काय करते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बिल जररेट करण, बिल देण, सर्व्हे करण, सर्व्हे केल्यानंतर वसुली नाही झाली तर नोटिस देण यांना वेळ लागतो. सगळयाला नोटिस देवून पूट अप झालेल आहे. बिल वाटप झालेली आहे, नोटिस वाटप झालेल आहे. वसुली पण जवळपास ५ कोटी रु. झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

जवळपास म्हणजे किती टक्के? ५ ते ७ % वसुली झालेली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बरोबर आहे, टॅक्स डिपार्टमेंटचे...............

**एस.ए.खान :-**

मा. सभापती महोदया, सध्या लिपिक तिकडे बसलेले आहे. आता तरी घरी दारी जात नाही किती शिल्लक राहिली ते. आता टाईमावर शशिकांत भोईर साहेबांनी सांगितल, टाईमावर जावून त्याचे नळ कापणे, सिल करणे, नुसत धाक दाखवून अस घ्यायचे. लिपिक बसलेले आहे ना. लिपिकांना काय काम आहे? संगणक चालक बिल वैगेरे वसुली करतात, पावती फाडतात आपले लिपिक बसलेले आहे ना. प्रभाग समितीमध्ये तुम्ही जावून बघा. त्यांना रिमाइन्ड करायला पाहिजे की, एवढी-एवढी थकबाकी आहे. काहीतरी होईल ना. नुसत नळ कापायच आपल काम आहे का? नळ कापून लोकांना त्रास द्यायच. नागरिकांना त्रास द्यायचं हे का आपलं आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आता सुरुवात केली नाही.

**एस.ए.खान :-**

आता नाही केली. पण नंतर करणार ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आतापर्यंत २४ कोटी ८७ लाख रु. वसुली केलेली आहे. जवळपास ३० % वसुली केलेली आहे. बाकी ७० वसुली होईल. तरी गेल्यावर्षी पेक्षा या नोव्हेंबरमध्ये जास्त वसुली झाली.

**जुबेर इनामदार :-**

साहेब बऱ्याच इमारतींना बिल पोचलेली नाही. आणि ही खरी परिस्थिती आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डिसेंबरमध्ये बजेटची चर्चा होईल तेव्हा इत्तंभूत चर्चा होईल ना.

**शशिकांत भोईर :-**

मोकळया जागेवरील कर आहे. मागच्या मिटींगमध्ये चर्चा केली होती.

**एस.ए.खान :-**

मा. सभापती महोदयांना विचारतो की, किती मोकळया जागेवर टॅक्स लावलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समिती ही वैधानिक समिती आहे. हयामध्ये तुमच्याकडे हेच विषय चर्चेला येणार. प्रशासन काय काम करते ते विचारायला हीच एक मुभा असते.

**अनिल सावंत :-**

मोकळया जागेवरील कर आहे त्याला बिल किती इश्यु केलेले आहेत?

**जुबेर इनामदार :-**

या त्रैमासिक जमा खर्चामध्ये स्थायी कर्मचाऱ्यांवर जो खर्च झालेला आहे तो वसुल केलेल्या पेक्षा जास्त आहे.

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाने याच्याबद्दल चर्चा केली पाहिजे आम्हाला माहिती दिली पाहिजे. त्यांनी जमा-खर्च दिला आहे तर आपल्याला विचारायला लागेल ना.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब पूढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ९२ :-**

त्रैमासिक जमा - खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०११-१२ चे मंजूर अंदाज पत्रकानुसार माहे १ जुलै २०११ ते ३० सप्टेंबर अखेर अंदाजपत्रकिय तरतुद व त्यानुसार झालेली प्रत्यक्ष जमा व त्याप्रमाणात झालेला प्रत्यक्ष खर्च ह्याबाबतचे त्रैमासिक लेखे अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले आहेत.

त्रैमासिक जमा खर्चाचा सर्व विभागवार आढावा घेतला असता असे दिसून येते की, जमा बाजू मध्ये अंदाज पत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त रक्कम जमा होण्याची शक्यता आहे. उदा. स्थानिक संस्था कराचे सध्या जमा झालेली रक्कम लक्षात घेता अपेक्षित उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न मार्च २०१२ अखेरपर्यंत होणार आहे. तसेच अंदाज पत्रकात विविध लेखाशिर्षाखाली विकास कामांसाठी तरतुद करण्यात आलेल्या खर्चाच्या रक्कमा सदर कामांच्या प्रक्रियेस अद्याप सुरुवात देखील न झाल्याने सदर लेखाशिर्षातील रक्कमा मार्च २०१२ अखेर पर्यंत अखर्चित राहणार आहेत.

तरी प्रशासनाने वरील बाबींचा पडताळा करुन अखर्चित राहू शकणाऱ्या तरतुदींची रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ नुसार पुर्नविनियोजन करुन अन्य आवश्यक विकास कामांसाठी उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजुरी करीता ठेवावा त्यासह ही सभा त्रैमासिक जमा खर्चास मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे प्रस्तावाना मान्यता देणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे कामी मा. नगरसेवक / मा. नगरसेविका यांच्या मागणीनुसार मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्या सोबत संयुक्त पहाणी केली आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | पोल संख्या |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) शांतीनगर सेक्टर ०७ ग्राऊंड | ०८ |
| २ | आंबेडकर नगर, स्मशानभूमी रोड, भाईंदर (प.) | ०४ |
| ३ | भाईंदर (प.) वसंत विहार जवळ | ०४ |
| ४ | साईबाबा गार्डन, विनायक नगर, भाईंदर (प.) | ०४ |
| ५ | नवघर पोलिस चौकी मागे व कस्तुरी पार्क | ०२ |
| ६ | धनलक्ष्मी इले. भाजीमार्केट खारीगाव | ०५ |
| ७ | ख्रिश्चन व मुस्लिम दफनभूमी, मिरारोड (पुर्व) | ०९ |
| ८ | डी.सी.बी. बँक गल्ली, मिरारोड (पुर्व) शितलनगर | ०३ |
| ९ | सेक्टर ९, शांती नगर, मिरारोड (पुर्व) | ०४ |
| १० | सेक्टर ८, शांती नगर, मिरारोड (पुर्व) | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | जांभली आगर, मुर्धा | | ११ |
| १२ | इंदिरा नगर भाटेबंदर उत्तन | | ०७ |
| १३ | चिखलखाडी, मोठा गाव, अलिबाग रोड, उत्तन | | ०३ |
| १४ | बुबु आगर मुर्धा | | ०४ |

वरील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी प्रस्तावाना मान्यता देण्यात येत आहे. मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना याबाबत त्वरीत कळविण्यात यावे.

**बर्नड डिमेलो :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

या ठरावामध्ये माझी सुचना आहे. दोन पत्रामध्ये मी सुचना दिलेली. एक सुचना १ ते १६ आहे. आणि दुसऱ्यामध्ये १ ते १३ आहेत. या २ सुचना या ठरावामध्ये समाविष्ट करुन घ्या.

१) चेणे गाव येथे पाटलीपाडा कडे जाणारा रस्ता
२) वरसावे गाव
३) वॉर्ड क्र. १ येथे विविध ठिकाणी
४) हरिश्चंद्र नगर झोपडपट्टी
५) चंदन पार्क, साई सावली
६) राहूल पार्क येथे हायमास दिवे लावणे
७) डोंगरी चौक गावातील अंतर्गत रस्त्यावर
८) डोंगरी चौक गावातील धक्क्यावर
९) उत्तन हनुमान मंदिर मागील रस्त्यावर
१०) तारोडी गावातील अंतर्गत रस्त्यावर
११) डोंगरी गांवातील अंतर्गत रस्त्यावर
१२) धावगी डोंगरावरील अंतर्गत रस्त्यावर
१३) चौक स्कायलॅम्प क्रॉसजवळ
१४) पाली व पातन बंदर येथे जेटीवर हायमास बसविणे
१५) जॉन्सनच्या वाडी
१६) चौक बांगलादेश येथे
१७) सुदामानगर रस्त्यावर स्ट्रीट लाईट / ट्रीपल ब्रेकेट साईट
१८) अयप्पा मंदिर मिरारोड - १ फोर वे स्ट्रीट लाईट
१९) रिलायन्स फ्रेश, मिरारोड समोरील चौकवर - १ फोर वे स्ट्रीट लाईट
२०) उत्तन भौतोडी बंदर येथील स्मशानभूमीच्या बाजुला विहिरी जवळ - १ फोर वे स्ट्रीट लाईट
२१) नवी खाडी येथील फातीमा माता समाज मंदिर जवळ - १ फोर वे स्ट्रीट लाईट
२२) दर्या माता चर्च रोड गल्ली - २ फोर वे स्ट्रीट लाईट
२३) कोळी नगर ते पवन पॅलेस पर्यंतच्या रस्त्यावर भाईंदर (पूर्व) आर.एन.पी. पार्क - ६ फोर वे स्ट्रीटलाईट
२४) वॉर्ड क्र. ७८ पेणकरपाडा सिध्दी विनायक नगर - ३ फोर वे स्ट्रीट लाईट
२५) कम्फर्ट हॉटेलच्या शेजारी रामदेव पार्क जाणारा रस्ता
२६) चौधरी समाज ते रामदेव पार्कला जाणारा रस्ता.
२७) एक्सप्रेस इन हॉटेलच्या बाजुने वरसावे गावात जाणारा रस्ता
२८) वॉर्ड क्र. ८ कस्तुरी पार्क शिवरतन येथे - २ फोर वे स्ट्रीट लाईट
२९) वॉर्ड क्र. ७७ भानजी उद्योग पेणकर पाडा प्रियेश इंडस्ट्रीज - ६ फोर वे स्ट्रीट लाईट
३०) वॉर्ड क्र. ७० एन.एस. पार्क व नित्यानंद नगर - १२ फोर वे स्ट्रीट लाईट
३१) श्री. तिरुपती कॉम्प्लेक्स परिसर व जैन मंदिर परिसर स्ट्रीट लाईट. (बालाजी नगर, भाईंदर (प.))

**लक्ष्मण जंगम :-**

ठरावामध्ये माझी पण सुचना आहे.

१) नविन गोल्डन नेस्ट फेज - ११ मिठालाल बंगल्या समोर
२) मेडतिया नगर फेज - १
३) आयडियल पार्क मुख्य रोड ते कॉम्प्लेक्स पर्यंत.
४) मिरा भाईंदर मुख्य रस्त्यालगत नताशा, प्रेसीडेंसी ॲम्बेसी कॉम्प्लेक्स पर्यंत.
५) क्विन्स पार्क नाका ते मयुर इमारती पर्यंत.
६) रामदेव पार्कमधील सर्व मुख्य रस्त्यावर.
७) वागड नगर नाका ते देवशांती इमारतीपर्यंत.
८) श्रीराम नगर संकुलामध्ये.
९) सुंदर नगर.

१०) मिरारोड स्वागत टॉवर रस्त्यावर.
११) बालाजी ग्रांड ते एच.डी.एफ.सी. बँकपर्यंत एक साईडला स्ट्रीट लाईट लावणे.
१२) अस्मिता सुपर मार्केट समोरील रस्त्यांवर हायमास दिवे लावण्यात यावे.
१३) शांतीनगर सेक्टर - ६ मैदान.

**एस.ए.खान :-**
या सूचनेला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
हायमासचा विषय आहे का? हायमास असेल तर..................

**एस.ए.खान :-**
बऱ्याच नगरसेवकांनी स्ट्रिट लाईटसाठी पत्र दिलेल आहे.

**लक्ष्मण जंगम :-**
विषय स्ट्रिट लाईटचा आहे ना ते स्ट्रिट लाईट मध्ये येत नाही का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
हायमास हा वेगळा विषय आहे. आणि स्ट्रीट लाईट मध्ये हायमास येते का?

**एस.ए.खान :-**
आम्ही बरेच पत्र दिलेले आहे. नगरसेवकांनी की स्ट्रीट लाईट लावण्यासाठी त्याचा समावेश ह्याच्यामध्ये नाही आहे. तर त्याचा समावेश याच्यात करण्यात यावा.

**शशिकांत भोईर :-**
मा. सभापती मॅडम, दुसर हायमास लावायचा आहे. मिरारोड पूर्व बाप्पा सिताराम व ख्रिश्चन दफनभूमी येथे हायमास लावण्याचा प्रस्ताव आहे.

**मा. सभापती :-**
सर्व सूचनेसह ठराव मंजूर करण्यात यावा.

**एस.ए.खान :-**
माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
संबंधीत अधिकारी जे काही ठिकाणी पोल लावले गेले आणि नंतर ते काढून घेतले. कोणाच्या तरी तक्रारीने म्हणजे पोल लावण्याचा काय नियम आहे.

**दिपक खांबित :-**
ठिकाण सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
तिरुपती कॉम्पलेक्स ठिकाणी तीन पोल लावले होते. आणि ते पोल कोणाच्या तरी तक्रारी वरुन काढण्यात आले. तो सार्वजनिक रस्ता आहे. तिकडून पाण्याची लाईल गेलेली आहे. महापालिकेचा डम्पर जातो. मग तो सार्वजनिक रस्ता नाही का?

**दिपक खांबित :-**
सार्वजनिक रस्ता म्हणजे आपण शिफ्टेड पोल लावले होते मागणीप्रमाणे. तर तक्रार आले की हा खाजगी रस्ता आहे. सोसायटीचा खाजगी रस्ता म्हटल्यावर आम्ही कशाला लावू. आम्ही काढून घेतले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
सोसायटीने तस सांगितल नाही. चार सोसायटी आहे. एका सोसायटीने तुम्हाला पत्र दिलेल आहे. बाकीच्या सोसायटीने पत्र दिलेच नाही. शेवटी सार्वजनिक रस्ता नाही. तर आपली पाण्याची लाईन तिकडे गेली. तिकडे आपल्या कचऱ्याचा डम्पर जातो. सर्व गोष्टी महापालिकेची आहे. मग स्ट्रिट लाईट लावण्यामध्ये व्यक्तिगत कोणी विरोध केला तर याची तुम्ही खबरदारी घ्या. तिकडे परत स्ट्रिट लाईट लावून घ्या.

**प्रकरण क्र. ९३ :-**
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे प्रस्तावाना मान्यता देणे.

**ठराव क्र. ८२ :-**
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे कामी मा. नगरसेवक / मा. नगरसेविका यांच्या मागणीनुसार मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्या सोबत संयुक्त पहाणी केली आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | पोल संख्या |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) शांतीनगर सेक्टर ०७ ग्राऊंड | ०८ |
| २ | आंबेडकर नगर, स्मशानभूमी रोड, भाईंदर (प.) | ०४ |
| ३ | भाईंदर (प.) वसंत विहार जवळ | ०४ |
| ४ | साईबाबा गार्डन, विनायक नगर, भाईंदर (प.) | ०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | नवघर पोलिस चौकी मागे व कस्तुरी पार्क | | ०२ |
| ६ | धनलक्ष्मी इले. भाजीमार्केट खारीगाव | | ०५ |
| ७ | ख्रिश्चन व मुस्लिम दफनभूमी, मिरारोड (पुर्व) | | ०९ |
| ८ | डी.सी.बी. बँक गल्ली, मिरारोड (पुर्व) शितलनगर | | ०३ |
| ९ | सेक्टर ९, शांती नगर, मिरारोड (पुर्व) | | ०४ |
| १० | सेक्टर ८, शांती नगर, मिरारोड (पुर्व) | | १० |
| ११ | जांभली आगर, मुर्धा | | ११ |
| १२ | इंदिरा नगर भाटेबंदर उत्तन | | ०७ |
| १३ | चिखलखाडी, मोठा गाव, अलिबाग रोड, उत्तन | | ०३ |
| १४ | बुबु आगर मुर्धा | | ०४ |

वरील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी प्रस्तावाना मान्यता देण्यात येत आहे. मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना याबाबत त्वरीत कळविण्यात यावे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. बर्नड डिमेलो**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१) चेणे गाव येथे पाटलीपाडा कडे जाणारा रस्ता
२) वरसावे गाव
३) वॉर्ड क्र. १ येथे विविध ठिकाणी
४) हरिश्चंद्र नगर झोपडपट्टी
५) चंदन पार्क, साई सावली
६) राहूल पार्क येथे हायमास दिवे लावणे
७) डोंगरी चौक गावातील अंतर्गत रस्त्यावर
८) डोंगरी चौक गावातील धक्क्यावर
९) उत्तन हनुमान मंदिर मागील रस्त्यावर
१०) तारोडी गावातील अंतर्गत रस्त्यावर
११) डोंगरी गांवातील अंतर्गत रस्त्यावर
१२) धावगी डोंगरावरील अंतर्गत रस्त्यावर
१३) चौक स्कायलॅम्प क्रॉसजवळ
१४) पाली व पातन बंदर येथे जेटीवर हायमास बसविणे
१५) जॉन्सनच्या वाडी
१६) चौक बांगलादेश येथे
१७) सुदामानगर रस्त्यावर स्ट्रीट लाईट / ट्रीपल ब्रेकेट साईट
१८) अयप्पा मंदिर मिरारोड - १ फोर वे स्ट्रीट लाईट
१९) रिलायन्स फ्रेश, मिरारोड समोरील चौकवर - १ फोर वे स्ट्रीट लाईट
२०) उत्तन भौतोडी बंदर येथील स्मशानभूमीच्या बाजुला विहिरी जवळ - १ फोर वे स्ट्रीट लाईट
२१) नवी खाडी येथील फातीमा माता समाज मंदिर जवळ - १ फोर वे स्ट्रीट लाईट
२२) दर्या माता चर्च रोड गल्ली - २ फोर वे स्ट्रीट लाईट
२३) कोळी नगर ते पवन पॅलेस पर्यंतच्या रस्त्यावर भाईंदर (पूर्व) आर.एन.पी. पार्क - ६ फोर वे स्ट्रीटलाईट
२४) वॉर्ड क्र. ७८ पेणकरपाडा सिध्दी विनायक नगर - ३ फोर वे स्ट्रीट लाईट
२५) कम्फर्ट हॉटेलच्या शेजारी रामदेव पार्क जाणारा रस्ता
२६) चौधरी समाज ते रामदेव पार्कला जाणारा रस्ता.
२७) एक्सप्रेस इन हॉटेलच्या बाजुने वरसावे गावात जाणारा रस्ता
२८) वॉर्ड क्र. ८ कस्तुरी पार्क शिवरतन येथे - २ फोर वे स्ट्रीट लाईट
२९) वॉर्ड क्र. ७७ भानजी उद्योग पेणकर पाडा प्रियेश इंडस्ट्रीज - ६ फोर वे स्ट्रीट लाईट
३०) वॉर्ड क्र. ७० एन.एस. पार्क व नित्यानंद नगर - १२ फोर वे स्ट्रीट लाईट
३१) श्री. तिरुपती कॉम्प्लेक्स परिसर व जैन मंदिर परिसर स्ट्रीट लाईट. (बालाजी नगर, भाईंदर (प.))

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. लक्ष्मण जंगम यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१) नविन गोल्डन नेस्ट फेज - ११ मिठालाल बंगल्या समोर
२) मेडतिया नगर फेज - १
३) आयडियल पार्क मुख्य रोड ते कॉम्प्लेक्स पर्यंत.
४) मिरा भाईंदर मुख्य रस्त्यालगत नताशा, प्रेसीडेंसी अॅम्बेसी कॉम्प्लेक्स पर्यंत.
५) क्विन्स पार्क नाका ते मयुर इमारती पर्यंत.
६) रामदेव पार्कमधील सर्व मुख्य रस्त्यावर.

७) वागड नगर नाका ते देवशांती इमारतीपर्यंत.
८) श्रीराम नगर संकुलामध्ये.
९) सुंदर नगर.
१०) मिरारोड स्वागत टॉवर रस्त्यावर.
११) बालाजी ग्रांड ते एच.डी.एफ.सी. बँकपर्यंत एक साईडला स्ट्रीट लाईट लावणे.
१२) अस्मिता सुपर मार्केट समोरील रस्त्यावर हायमास दिवे लावण्यात यावे.
१३) शांतीनगर सेक्टर - ६ मैदान.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४, पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यांत येणाऱ्या परिवहन उपक्रमामधील प्रवास तिकीट दरात वाढ करणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमामधील पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यात येणाऱ्या बसेसच्या प्रवासी तिकिट दरात दरवाढीसाठी सदरचा प्रस्ताव दिलेला आहे. मे. केस्ट्रेल इन्फ्रा. प्रा.लि. ह्यांनी परिवहन उपक्रमामध्ये चालणाऱ्या बसेस उभ्या करण्यासाठी स्वतःची अशी कोणतीही व्यवस्था केलेली नाही. सर्व बसेस महानगरपालिकेच्या रस्त्यांवर पार्किंग केल्या जातात. यासाठी ठेकेदार महानगरपालिकेकडे कोणतेही भाडे भरणा करीत नाही. यामुळे ठेकेदाराचे पार्कींग बाबतचे भाडे खर्ची न पडता त्यांचा फायदा होत आहे. तसेच मध्यंतरीच्या कालावधीमध्ये पेट्रोल / डिझेलचे दर देखील कमी झालेले आहेत. ठेकेदाराकडून चालविण्यात येणाऱ्या बसेसची अवस्था देखील दयनीय आहे. तसेच ठेकेदाराकडून परिवहन सेवांचे व्यवस्थित नियोजन न केल्याने शहरातील नागरीकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे शहरातील नागरीक परिवहन सेवेबाबत नेहमी तक्रारी करीत असतात. करिता महानगरपालिकेने यापूर्वी ठरवून दिलेले प्रवासी तिकिट भाडे योग्य असून यामध्ये काणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात येऊ नये, असा मी ठराव मांडीत आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय मला या विषयावर बोलायच आहे. परिवहनचा विषय स्थायी समिती समोर विषय झालेला आहे. त्याचे कोणी अधिकारी आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

राऊत साहेब आणि दिपक सावंत आहेत. दिपक सावंत आलेले नाही. आणि राऊत साहेबांची कोकण भवनमध्ये मिटींग आहे. त्यामुळे ते तिकडे गेले.

**अनिल सावंत :-**

शहरामध्ये आता किती बसेस चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

ही माहिती देणार कोण?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगिने बोलते, काल आमच्या रोडवर सात वाजल्यापासून जी ट्रॅफिक होती ती ट्रॅफिक कशामुळे झाली आपल्या मिरा भाईंदरच्या बसमुळे झाली. ती बस रस्त्यातच बंद पडली. गेल्या महासभेत पण मी बोलली होती की आपल्या बसेस टाईमाटाईमाला बंद पडतात. प्रवाशांचे हाल होतात. तीच परिस्थिती परत का घडली. सात वाजता ती बस बंद पडली. सुभाषचंद्र बोस मैदान पासून ते उत्तन पर्यंत ट्रॅफिक झाली होती आणि बरोबर दोन तास ट्रॅफिक होती. त्याला जबाबदार कोण? त्याच्याशिवाय तिथे ॲम्ब्युलन्स आली त्याच्यामध्ये पेशंट होता. तो माणूस हॉस्पिटलला पोहचला की नाही ते माहित नाही. त्याला जबाबदार कोण? म्हणजे या बस परिवहनमुळे सगळयांना त्रास का? त्या रोडनी आपले आमदार साहेब गिल्बर्ट शेट पण गेले. त्यांना पण माहित आहे. हे चालल काय?

**जुबेर इनामदार :-**

त्याची अडचण त्याला सातत्याने विचारल तेव्हा तो बोलतो माझ्याकडे डेपोची जागा उपलब्ध नाही. त्याला डेपोची जागा देण्यात आली.

**नयना म्हात्रे :-**

प्रत्येक नगरसेवक मिटींगमध्ये बोलतात. स्टँडींगमध्ये बोलतात, मा. महासभेत बोलतात. नेमक त्याचावर कारवाई काही नाही का? एखाद्या माणसाची फोर व्हिलर बंद पडली की तो लगेच माणूस गाडी गॅरेजमध्ये नेतो, या ठेकेदाराला मिरा भाईंदरच्य नागरिकांची काही काळजी नाही का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती महोदय, या विषयावर महापालिकेच्या मा. महासभेमध्ये दोन वेळा लक्षवेधी आली. आमची विनंती आहे. आज स्थायी समितीच्या माध्यमाने पुन्हा मा. महासभेमध्ये या विषयावर पुन्हा चर्चा घडवून आणावी आणि योग्य तो निर्णय घ्यावा अस आपण आज अधिकाऱ्यानां सांगुन विषय मा. महासभेत पुन्हा आणावा. आणि आता हा विषय रद्द करुया.

**भगवती शर्मा :-**

आपण फाईन पण केल आहे. पण फाईन करुन पण काय उपयोग आहे.

**नयना म्हात्रे :-**

मॅडम, तुम्ही मा. महापौर साहेबांना सांगुन विषय पत्रिकेवर तो विषय घ्याना. आम्ही ज्या वेळेला मा. महासभेमध्ये बोलतो ना त्यावेळेला त्या परिवहनचा अधिकारी नसतो. स्टँडींगला सुध्दा तो अधिकारी नसतो. पानपट्टे साहेब त्याच्यावर काय उत्तर देणार?

**भगवती शर्मा :-**

मा. महासभा में भी पिछले बार विषय निकाले अब इन्होने बताया की, बसेस कहा खराब हुई थी वही की वही खडी है। उन्होंने बताया की, वह रस्ता ऐसा लग रहा है जैसे पार्किंग के लिए बनाया। उसमे अट निकाल दी गयी की, उसको पार्कींग की व्यवस्था महानगरपालिका देगी उसका भाडा वह देगा। लेकिन अपनेपास ऐसी कोई व्यवस्था है नही की, कहाँसे उसको अपन जगह देगे। दुसरी बात की कोई भी रुट के अंदर जैसे कोई भी रुट देते है की, यह उत्तन का रुट है, भाईंदर पश्चिम का स्टेशन का रुट है। उस रुट को हिसाब से २५% भी नही चल पाती है। हमेशा जैसे बताया ब्रेक डाऊन रहती है। मोस्टली समस्या क्या है की, उसके अंदर इस व्यक्ती ने टेम्पररी टायर रखता है परमन्ट रखा ही नही। उसके कारण से कोई भी स्टाफ उसके पास आता नही। एक स्टाफ से डबल-डबल, ट्रिपल-ट्रिपल डयूटी कराता है। यह सभी कारण है इनामदार साहब। उसके कारण से सोचके कितना टाईम तक चलायेंगे।

**अनिल सावंत :-**

ठराव करदो, ठेका रद्द करो करके।

**भगवती शर्मा :-**

इसमे नही। मा. महासभा मे।

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती मॅडम, तुम्ही याची आढावा बैठक स्थायी समितीमध्ये लावा.

**मा. सभापती :-**

सदर विषयाचे अधिकारी माहीती देण्यासाठी उपस्थित नाही तेव्हा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. महासभेत विषय घेण्यात यावा. अशी शिफारस करण्यात येत आहे. हा ठराव मंजुर करण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, इथे शिक्षण विभागाचे अधिकारी आले आहेत का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आहेत.

**अनिल सावंत :-**

अपंग शासनाच्या निर्देषाप्रमाणे शहरामध्ये जे अपंग विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी आपण काही शिक्षकांची नेमणूक केलेली आहे. महापालिकेमार्फत त्यांना पगार दिला जातो. तर असे ते किती शिक्षक आहेत? आणि त्यांच्यावर कोण अधिकारी आहेत/ आणि आजपर्यंत जी कार्यपध्दत आहे त्याचा आढावा काय आहे? विद्यार्थी किती आहेत? त्याच्यावर अधिकारी कोण आहे?

**एन.एल.बागले :-**

निलेश गुजर म्हणून आहेत त्यांची नेमणूक केलेली आहे. आणि १७६० अपंग विद्यार्थी आहेत. आणि त्यांना दोन तास शिकवण्यासाठी म्हणजे जास्त अपंग असला तर घरी सुध्दा शिक्षक जातात. मोबाईल टिचर जातात.

**अनिल सावंत :-**

मोबाईल टिचर किती आहेत?

**एन.एल.बागले :-**

मोबाईल टिचर जवळ-जवळ १६ नेमलेले आहेत.

**अनिल सावंत :-**

तर तुम्ही त्यांचा आढावा कधी घेतला आहे का?

**एन.एल. बागले :-**

हो, त्यांचा मासिक आढावा घेतला जातो, त्यांचा रिपोर्ट घेतला जातो.

**अनिल सावंत :-**

तो रिपोर्ट पूढच्या स्टँडींग कमिटीमध्ये द्या.

**एन.एल. बागले :-**

आणि मुख्यध्यापकांकडे त्यांच मस्टर असत. तिथे ते सही करतात. तिथुन दोन तास अपंग विद्याथ्यांना शाळेत शिकवतात. त्यानंतर ते २-२ तास घरी सुध्दा जातात.

**नयना म्हात्रे :-**

शिक्षण अधिकारी साहेब तुम्ही आता अस बोलले की, शाळेमध्ये देखिल दोन तास शिकवतात. आणि घरी देखिल दोन तास जातात. अस हया पालकांना उभे करुन आम्हाला सांगणार का? खरोखर या मुलांना तुम्ही शाळेत देखिल शिकवल आणि घरी देखिल दोन तास शिकवल. मी प्रुफ करुन देईन की तुमचे शिक्षक घरी जातच नाही. याबाबत माझी तक्रार देखिल आहे.

**एन.एल. बागले :-**

आज संध्याकाळी साडेचार वाजता आयुक्त साहेबांनी आढावा बैठक घेतली आहे. मुख्यध्यापकांची आणि सर्व शिक्षकांची. अपंग समाजाचे शिक्षक आहेत. त्यांची मिटिंग ५.०० वाजता ठेवली आहे.

**नयना म्हात्रे :-**

मिटींग ५ वाजता लावली. पण तुम्ही आता काय उत्तर दिल की, २ तास शाळेमध्ये शिकवतात आणि २ तास घरी देखिल जातात. म्हणजे त्याच विद्यार्थ्यांना का?

**एन.एल. बागले :-**

नाही. त्याच विद्यार्थ्यांना नाही. जे जास्त अपंग असतील. जे शाळेत येवू शकत नाही. त्यांच्यासाठी घरी जातात.

**प्रकरण क्र. ९४ :-**

पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यांत येणाऱ्या परिवहन उपक्रमामधील प्रवास तिकीट दरात वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. ८३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमामधील पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यात येणाऱ्या बसेसच्या प्रवासी तिकिट दरात दरवाढीसाठी सदरचा प्रस्ताव दिलेला आहे. मे. केस्ट्रेल इन्फ्रा. प्रा.लि. ह्यांनी परिवहन उपक्रमामध्ये चालणाऱ्या बसेस उभ्या करण्यासाठी स्वतःची अशी कोणतीही व्यवस्था केलेली नाही. सर्व बसेस महानगरपालिकेच्या रस्त्यांवर पार्किंग केल्या जातात. यासाठी ठेकेदार महानगरपालिकेकडे कोणतेही भाडे भरणा करीत नाही. यामुळे ठेकेदाराचे पार्कींग बाबतचे भाडे खर्ची न पडता त्यांचा फायदा होत आहे. तसेच मध्यंतरीच्या कालावधीमध्ये पेट्रोल / डिझेलचे दर देखील कमी झालेले आहेत. ठेकेदाराकडून चालविण्यात येणाऱ्या बसेसची अवस्था देखील दयनीय आहे. तसेच ठेकेदाराकडून परिवहन सेवांचे व्यवस्थित नियोजन न केल्याने शहरातील नागरीकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे शहरातील नागरीक परिवहन सेवेबाबत नेहमी तक्रारी करीत असतात. करिता महानगरपालिकेने यापूर्वी ठरवून दिलेले प्रवासी तिकिट भाडे योग्य असून यामध्ये काणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात येऊ नये, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदन :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९५, कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**शशिकांत भोईर :-**

याच्यामध्ये माझी एक सुचना आहे. एक नंबरच जे काम आहे तिथे ते रस्ता अगोदर बनवणार आहेत. तर गटर कधी बनवणार? अगोदर गटर बनवून घ्या नंतर रस्ता बनवून घ्या. कारण, गटर नाही बनवणार तर रस्ता फुटणार आणि चार नंबरच काम भाईंदर पूर्वेमध्ये सुरुवात झालेली आहे. आणि आता आपण त्याला आर्थिक प्रशासकीय मंजुरी देतो.

**भगवती शर्मा :-**

१) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग झंकार कंपनी पासून पूजापार्क व पुढे सिल्व्हर सरीता कडे जाणारा रस्ता असून सदरचा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. पावसाळयात रस्त्यावर पाणी साचून मोठे मोठे खड्डे पडल्यामुळे नागरीकांकरीता ये-जा करणेंस त्रास

सहन करावा लागतो. या रस्त्यावरील खड्डे काही प्रमाणांस खडीकरणाने बुजविण्यात आलेले आहे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार नसल्यामुळे पाण्याचा निचरा होणेस अडथळा होतो.

उपरोक्त रस्ता रहदारीचा असून सदर रस्ता मजबूतीकरण करुन डांबरीकरण करणे आवश्यक आहे. वरील कामी झंकार कंपनी ते पूजापार्क पर्यंत खडीकरण व ग्राऊंटींग करुन डांबरीकरण करणेकामी रु.२७,९०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

२) भाईंदर (पुर्व) दिपक हॉस्पीटल ते हर्ष प्लाझाकडे जाणारा रस्ता १८.०० मीटर डी.पी. रस्ता असून सदर रस्ता भुयारी गटार योजनेसाठी खोदण्यात आलेला होता. सदर रस्ता भुयारी गटार योजनेसाठी खोदण्यात आलेला होता. सदर रस्त्यावर W.B.M. व Grouting चे मध्यभागी काम झाले आहे. उर्वरीत ठिकाणी W.B.M. व संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करण्याची आवश्यकता असून त्याकरीता रु.४९,५६,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) हटकेश उद्योगनगर येथील गौरव इन्क्लेव्ह ते मंगलनगर व ३०.०० मीटर हटकेश डी.पी. रोड पर्यंतचा रस्ता आजपर्यंत मनपामार्फत तयार केलेला नसून सदर भागात मोठया प्रमाणावर लोकवस्ती आहे. सदर रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु.४९,९३,८००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

४) भाईंदर (पुर्व) नवघर फाटक रोड वरील सुंदरभवन इमारती पासून नवघर नाक्यापर्यंत उर्वरीत नाल्याची पुर्नबांधणी करण्याकरीता मा. उपमहापौर निधीतून काम प्रस्तावित केले आहे. सदर कामाचे रु.४९,९९,७५०/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर काम करणे आवश्यक आहे.

वरील कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास येत आहे. सदर कामी निविदा मागविण्यात याव्यात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

मा. सभापती महोदय, मला एक विचारायच आहे. माझ्या वॉर्डचे जे ज्युनिअर इंजिनियर आहेत. त्यांच्या बदली कोणी दुसर ज्युनियर इंजिनियरला अपॉईन्ट केल की नाही? निशांत जाधव होते ते आता He is no more with us. तर त्यांच्या ऐवजी कोणी दुसरे रिप्लेसमेंट केले आहे की नाही ते मला विचारायचे आहे. कारण मेन शितल नगरचा रोड जो चालू आहे................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अजून नेमल नाही.

**मर्लिन डिसा :-**

तर प्लीज नेमणूक करा. कारण रोडच काम चालू आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

दिपक हॉस्पीटल कडून जो रस्ता घेतलेला आहे. हर्ष अपार्टमेन्ट पर्यंत ४९ लाखाच जे बजेट याच्यामध्ये सांगितल. तो पण गटाराचा आधि भाग केलेला नाही. रस्ता तर जाण्यायेण्या सारखा आहे. तर त्याच्यात परत काय मंजूरी करणार? दिपक हॉस्पीटल पासून ते हर्ष अपार्टमेन्ट चालण्यासारखा रस्ता व्यवस्थित आहे. पण गटर जे नाही आहे त्याच्यासाठी प्रॉब्लेम होतो तर ते पहिल झाल पाहिजे ना. याच हे करुन काय करणार. माझी याच्यामध्ये अशी सुचना आहे की रस्त्याच काम थांबवून गटाराच काम पहिल करा. ते फार महत्त्वाच आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, पूढचा विषय घेण्यात यावा. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९५ :-**

कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ८४ :-**

१) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग झंकार कंपनी पासून पूजापार्क व पुढे सिल्व्हर सरीता कडे जाणारा रस्ता असून सदरचा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. पावसाळयात रस्त्यावर पाणी साचून मोठ - मोठे खड्डे पडल्यामुळे नागरीकांकरीता ये-जा करणेंस त्रास सहन करावा लागतो. या रस्त्यावरील खड्डे काही प्रमाणांस खडीकरणाने बुजविण्यात आलेले आहे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार नसल्यामुळे पाण्याचा निचरा होणेस अडथळा होतो.

उपरोक्त रस्ता रहदारीचा असून सदर रस्ता मजबूतीकरण करुन डांबरीकरण करणे आवश्यक आहे. वरील कामी झंकार कंपनी ते पूजापार्क पर्यंत खडीकरण व ग्राऊंटींग करुन डांबरीकरण करणेकामी रु.२७,९०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

२) भाईंदर (पुर्व) दिपक हॉस्पीटल ते हर्ष प्लाझाकडे जाणारा रस्ता १८.०० मीटर डी.पी. रस्ता असून सदर रस्ता भुयारी गटार योजनेसाठी खोदण्यात आलेला होता. सदर रस्ता भुयारी गटार योजनेसाठी खोदण्यात आलेला होता. सदर रस्त्यावर W.B.M. व Grouting चे मध्यभागी काम झाले आहे. उर्वरीत

ठिकाणी W.B.M. व संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करण्याची आवश्यकता असून त्याकरीता रु.४९,५६,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) हटकेश उद्योगनगर येथील गौरव इन्क्लेव्ह ते मंगलनगर व ३०.०० मीटर हटकेश डी.पी. रोड पर्यंतचा रस्ता आजपर्यंत मनपामार्फत तयार केलेला नसून सदर भागात मोठया प्रमाणावर लोकवस्ती आहे. सदर रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु.४९,९३,८००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

४) भाईंदर (पुर्व) नवघर फाटक रोड वरील सुंदरभवन इमारती पासून नवघर नाक्यापर्यंत उर्वरीत नाल्याची पुर्नबांधणी करण्याकरीता मा. उपमहापौर निधीतून काम प्रस्तावित केले आहे. सदर कामाचे रु.४९,९९,७५०/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर काम करणे आवश्यक आहे.

वरील कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास येत आहे. सदर कामी निविदा मागविण्यात याव्यात.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी खालील सुचना मांडली.**

परंतु सदर जागी सिवरेज प्लान्टचे (भुयारी गटार) काम बाकी असल्याने सदर भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर रोडचे काम घेण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांच्या निर्बीजीकरण व लसीकरणाची निविदा स्विकारणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरणाची निविदा मागविणेसाठी मा. स्थायी समिती सभा दि. १६/०७/२०११ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली होती. त्या नुसार दि. ०१/८/२०११ व दि. १४/९/२०११ रोजी ई-टेंडरींग पध्दतीने फेर जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन त्यांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, ठाणे | मे. रॉयल व्हेंटनरी सोसायटी | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू.) |
|---|---|---|---|
| १ | - | रु. ३६,५५,०००/- | **रु. ३५,००,०००/-** |

वरील निविदेचे तांत्रिक लिफाफा उघडला असता मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, ठाणे यांनी AWBI Registration Certificate जोडलेले नसल्याने त्यांचे दरपत्रक उघडण्यात आले नसून उपरोक्त दोन निविदाधारकांचे दरपत्रक उघडले असता मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू.) यांचे दर कमी असुन कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो., यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर निविदेत मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निर्बिजीकरण न झालेल्या कुत्र्यांचा सर्व्हे करुन दर भरण्यात आलेले आहेत. निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकाला अटीशर्ती घालून देण्यात आलेल्या होत्या.

१) सन २०११-१२ या आर्थिक वर्षात निविदाधारकाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांवर १००% निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण करावयाचे आहे.

२) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात निविदाधारकाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात जर नविन पिल्ले आढळली तर पिल्ले दिलेल्या प्रती कुत्रीसाठी रु. १०००/- दंड निविदाधारकास भरावा लागेल व पिल्ले मोठी झाल्यावर त्याच वर्षात स्वखर्चाने त्या पिल्ल्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण निविदाधारकाने करावयाचे आहे.

३) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात नविन पिल्ले आढळुन आल्यास पिल्ले दिलेल्या कुत्रीसाठी रु. १५००/- दंड निविदाधारकास भरावा लागेल व पिल्ले मोठी झाल्यावर त्याच वर्षात स्वखर्चाने त्या पिल्लांचे निर्बिजीकरण व लसीकरण निविदाधारकाने करावयाचे आहे.

४) या बरोबरच मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जखमी व पिसाळलेल्या कुत्र्यांवर उपचार देखील निविदाधारकाने करावयाचे आहे.

वरीलप्रमाणे अटीशर्ती टाकुन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. या कामास मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू.) यांच्या कमी दराची निविदा स्विकारण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती महोदय, याच्यामध्ये आपली आर्थिक, प्रशासकीय बजेट किती आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

यावर्षीच २२ लाख रु. होत. त्याच्यातले १२ लाख रु. शिल्लक आहेत.

**अनिल सावंत :-**

पुढे ३५ लाख रु. का वाढवलं?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

३ वर्षासाठी केल आहे. सर्व्हेक्षण करु.

**अनिल सावंत :-**

याच्या पूर्वी आपल जे टेंडर व्हायच तेव्हा प्रत्येक कुत्र्याचा रेट फिक्स होते. निर्बिजिकरणाला आता हे लमसम ३५ लाख रु. डायरेक्ट कस काय? तुम्ही कुत्र्यांची संख्या मोजली, कुत्रे वाढले की काय झाल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांना सर्व्हेक्षण करायला सांगितल आहे. सर्व्हेक्षण करुन रेट भरायला सांगितल. दरवर्षी कस मोजके...

**अनिल सावंत :-**

सर्व्हेक्षण काय केल तुम्ही? किती कुत्रे आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यात अंदाजे ३ ते ४ हजार कुत्रे आहेत.

**अनिल सावंत :-**

निर्बिजिकरण केलेले की न केलेले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

निर्बिजिकरण केलेले.

**अनिल सावंत :-**

आणि केलेले किती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

केलेले १८ ते २० हजार कुत्रे आहेत.

**अनिल सावंत :-**

उपायुक्त साहेब, तुम्ही गोषवाऱ्यामध्ये कुत्र्यांची संख्या दिली पाहिजे होती. एवढे कुत्रे आहेत. त्यांच्यासाठी ३५ लाख रु. आम्ही ठेवलेले आहेत. त्याच्यातले किती करणार आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

संपूर्ण जबाबदारीने करणार.

**जुबेर इनामदार :-**

मला एक सांगा. आपण त्या कुत्र्याचं निर्बिजिकरण केल्यानंतर त्या कुत्र्यांवर खुणा काय करतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कानावर 'जी' मार्क करतो.

**लक्ष्मण जंगम :-**

मागच्या वेळेच टेंडर आहे २२ लाखाच, आणि कुत्र्यांच निर्बिजिकरण करण्यासाठी.............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यावेळेला मी सांगत होतो की, एकदाच ४०-५० लाख रु. दिल्याशिवाय संपूर्ण शहराच होणार नाही. गेल्यावर्षी फक्त १५ लाख रु. दिले होते. यावर्षी फक्त जास्त मागवतो.

**अनिल सावंत :-**

बजेट अजून द्यायचा आहे. त्याच्या अगोदर तुम्ही कुठे प्रोव्हिजन करता कस होवू शकतो?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

यावर्षी जेवढ बजेट आहे तेवढच खर्च होणार.

**अनिल सावंत :-**

पूढच्या वर्षीच बजेट अजून व्हायच आहे. त्यांना अगोदर तुम्ही कस काय मान्यता देवू शकता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

यावर्षी तो खर्चच होणार नाही.

**नयना म्हात्रे :-**

गेल्यावर्षीचे १० लाख रु. आपल्याकडे बाकी आहे ना मग, तुम्ही मध्येच कसा काय विषय आणला. पहिले १० लाख रु. आहे ते पहिले संपवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कसे असते एका वर्षात दोन वेळेस कुत्री गरोदर होतात. दोन वेळेला जन्म दिल्यानंतर एका वेळेस ८ ते १० पिल्यांना जन्म देते. एका वर्षामध्ये जवळपास १५ ते २० पिल्यांना जन्म देतात.

**अनिल सावंत :-**

ऑडिटर साहेब, मला एक सांगा गेल्यावर्षीच आपल जे प्रोव्हिजन आहे. ते पुढच्या वर्षी कॅरी फॉरवर्ड होत नाही. तुम्ही खर्च नाही केला तर लॅप्स होवून जाते. मग, तुम्ही बजेट प्रोव्हिजन केल्याशिवाय आर्थिक, प्रशासकीय मंजूरी देवू शकता का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इसके पहले एक विषय आया था, सन्मा. नगरसेवक ने लाया था। की यह साल का १० लाख रु. नगरसेवक फंड है। तो अगला १० लाख रु. आनेवाला है तो दोनो नगरसेवक फंड मिलाकर आर्थिक प्रशासकीय दे सकते है क्या?

**अनिल सावंत :-**

गलत है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपने ही दिया था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, आर्थिक प्रशासकीय मंजुरी त्यावेळी स्थायी समितीने दिली होती. त्यावेळी ही चर्चा झाली होती.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. तसेच सभा संपली असे मी जाहिर करते.

**प्रकरण क्र. ९६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांच्या निर्बीजीकरण व लसीकरणाची निविदा स्विकारणेबाबत.

**ठराव क्र. ८५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरणाची निविदा मागविणेसाठी मा. स्थायी समिती सभा दि. १६/०७/२०११ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली होती. त्या नुसार दि. ०१/८/२०११ व दि. १४/९/२०११ रोजी ई-टेंडरींग पध्दतीने फेर जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन त्यांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, ठाणे | मे. रॉयल व्हेंटनरी सोसायटी | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू.) |
|---|---|---|---|
| १ | - | रु. ३६,५५,०००/- | रु. ३५,००,०००/- |

वरील निविदेचे तांत्रिक लिफाफा उघडला असता मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, ठाणे यांनी AWBI Registration Certificate जोडलेले नसल्याने त्यांचे दरपत्रक उघडण्यात आले नसून उपरोक्त दोन निविदाधारकांचे दरपत्रक उघडले असता मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू.) यांचे दर कमी असुन कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो., यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर निविदेत मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निर्बिजीकरण न झालेल्या कुत्र्यांचा सर्व्हे करुन दर भरण्यात आलेले आहेत. निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकाला अटीशर्ती घालून देण्यात आलेल्या होत्या.

१) सन २०११-१२ या आर्थिक वर्षात निविदाधारकाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांवर १००% निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण करावयाचे आहे.

२) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात निविदाधारकाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात जर नविन पिल्ले आढळली तर पिल्ले दिलेल्या प्रती कुत्रीसाठी रु. १०००/- दंड निविदाधारकास भरावा लागेल व पिल्ले मोठी झाल्यावर त्याच वर्षात स्वखर्चाने त्या पिल्ल्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण निविदाधारकाने करावयाचे आहे.

३) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात नविन पिल्ले आढळुन आल्यास पिल्ले दिलेल्या कुत्रीसाठी रु. १५००/- दंड निविदाधारकास भरावा लागेल व पिल्ले मोठी झाल्यावर त्याच वर्षात स्वखर्चाने त्या पिल्लांचे निर्बिजीकरण व लसीकरण निविदाधारकाने करावयाचे आहे.

४) या बरोबरच मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जखमी व पिसाळलेल्या कुत्र्यांवर उपचार देखील निविदाधारकाने करावयाचे आहे.

वरीलप्रमाणे अटीशर्ती टाकुन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. या कामास मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू.) यांच्या कमी दराची निविदा स्विकारण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ – दुपारी १२.४५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०१/२०१२

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१०४)** :- खारीगांव (बंदरवाडी) स्मशानभूमी देखभाल व दुरुस्ती करणेस मे. परहीत सेवा संघ यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

भाईंदर (पूर्व) खारीगांव (बंदरवाडी) स्मशानभूमी परहीत सेवा संघ मार्फत विकसित करण्यात आलेली आहे. सदर स्मशानभूमीची देखभाल, दुरुस्ती देखिल परहीत सेवा मार्फत चांगल्या प्रकारे करण्यात येते. सदर कामाची मुदत ही दि.२८/३/२०१२ रोजी संपत असून मे. परहीत सेवा संघ यांनी पुढील ३० वर्षाकरीता देखभाल व दुरुस्तीचे कामाकरीता परवानगी मागितलेली आहे. मे. परहीत सेवा संघ यांचे काम पाहता त्यांना पुढील ५ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PSB/ DK/2011-12 /SG5

गोणवारा प्राप्त दि. २६/१२/२०११

[signature]

वेळ- १२=१५ वा

स्थायी समिती गोणवारा
नोंद रजि. क्रं. १६.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२०१२

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक :- ( १०५ ) निवीदांना मान्यता देणे.

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | काशिगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, झंकार कंपनी ते पूजा पार्क पर्यंत रस्ता मजबूतीकरण व डांबरीकरण करणे. | रु.२९,९०,०००/- |
| | **१) आर ॲण्ड बी ईन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि** | **१९.00 % कमी दराने** |
| | २) मे. रमेश ॲण्ड असोसीएटस | १८.९७ % कमी दराने |
| | ३) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | १४.0१ % कमी दराने |
| | ४) आर.एस कंन्स्ट्रक्शन | १२.२१ % कमी दराने |
| | ५) आशापुरा कंन्स्ट्रक्शन | १२.१५ % कमी दराने |
| | ६)सोनल एनटरप्राईजेस | १२.0१ % कमी दराने |
| | ७)एकता कंन्स्ट्रक्शन | १२.00 % कमी दराने |
| | ८)यश इंन्टरप्राईजेस | ९.९९ % कमी दराने |
| २ | हटकेश येथील गौरव एन्क्लेव्ह ते मंगलनगर व हटकेश डी.पी.रोड पर्यंत रस्ता मजबूतीकरण व डांबरीकरण करणे. | रु.४९,९३,८००/- |
| | **१) आर ॲण्ड बी ईन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि** | **१९.00 % कमी दराने** |
| | २) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | १४.0१ % कमी दराने |
| | ३) सोनल एनटरप्राईजेस | १३.९१ % कमी दराने |
| | ४) आशापुरा कंन्स्ट्रक्शन | १२.१५ % कमी दराने |
| | ५) आर.एस कंन्स्ट्रक्शन | १२.१५ % कमी दराने |
| | ६) यश इंन्टरप्राईजेस | ९.९८ % कमी दराने |
| | ७) हिरानी इंन्टरप्राईजेस | ९.0१ % कमी दराने |
| ३ | भाईंदर (पुर्व) येथील दिपक हॉस्पीटल ते हर्ष प्लाझा इमारतीपर्यंत रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु.४९,५६,०००/- |
| | **१) मे.आर ॲण्ड बी ईन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि** | **१९.00 % कमी दराने** |
| | २) मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन | १२.१५ % कमी दराने |
| | ३) मे.आर.एस कंन्स्ट्रक्शन | १२.११ % कमी दराने |
| | ४) मे.सोनल एनटरप्राईजेस | १२.११ % कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| | ४) मे.सोनल एनटरप्राईजेस<br>५) मे.एकता कंन्स्ट्रक्शन<br>६) मे.यश इंन्टरप्राईजेस<br>७) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | १२.११ % कमी दराने<br>१२.00 % कमी दराने<br>९.९७ % कमी दराने<br>९.00 % कमी दराने |
| ४ | भाईंदर (पूर्व) नवघर फाटक रोडवरील सुंदर भवन इमारत ते नवघर नाक्यापर्यंत जाणाऱ्या नाल्याची पुर्नःबांधणी करणे. (उपमहापौर निधी)<br>**१)मे. विराज कंन्स्ट्रक्शन**<br>२) मे.मुसकान एनंटरप्राईजेस<br>३) मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन को | .४९,९९,७५०/-<br>**अंदाजपत्रकीय दराने**<br>१.00 % जास्त दराने<br>२.00 % जास्त दराने |
| ५ | भाईंदर (पुर्व) नवघर नाक्यापासून एस. एन. कॉलेजकडे जाणाऱ्या नाल्यावरती स्लॅब टाकून मच्छी मार्केट बांधणे.<br>**१) मे.विराज कंन्स्ट्रक्शन**<br>२) मे.मुसकान एनंटरप्राईजेस<br>३) मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन को | रु. २४,९९,४००/-<br>**अंदाजपत्रकीय दराने**<br>0१.00% जास्त दराने<br>0२.0१ % जास्त दराने |

वरील पैकी सर्वात कमी दराचा निविदाना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

प्राप्त दि. २७।१२।१७
वेळ सा. १०.२० वा.
२७।१२।१७

स्थायी समिती गोषवारा नोंद रजिस्टर

अ.क्र. १८.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०९/२०१२

(९)

प्रकरण क्र :- ( १०६ )          मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांस मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च | लेखाशिर्ष | मा.आयुक्त निविदा मंजूरी दिनांक | ठेकेदाराचे नांव / कामाचा दर | मंजूर दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जांगिड कॉम्पलेक्स गृहसंकुलातील गंगोत्री बी इमारतीपासून ते रवी चिनाब यमुनोत्री इमारतीत पर्यंत बंदिस्त सी.सी. गटार बांधणे. | रू.५,२७,२००/- | गटारे नविन | दि.२६/१२/११ | मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस | ५.५ % कमी दराने |
| २ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ३४ येथील साई स्नेहा अपार्टमेंट व अस्मीता अपार्ट समोरील रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे. | ९,९५,५००/- | नगरसेवक निधी | दि.२९/११/११ | मे. एम.एस. इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | भाईंदर (पुर्व) प्र.क्र. ४३ मधील सोनल कुंज ते शालीभद्र नं. ५ पर्यंत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. (नगरसेवक निधी) | ५,४६,४००/- | नगरसेवक निधी | दि.२४/११/११ | मे. ललित कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | मिरारोड (पुर्व) वॉर्ड क्र. ६७ मधील ऑलम्पीया इमारतीसमोर तसेच साई दर्पण ते शांती विहार ओ १ इमारतीपर्यंत गटारावरती पेव्हर ब्लॉक व कर्बस्टोन व लोखंडी जाळया बसविणे. | रू. ९,५४,९५०/- | नगरसेवक निधी | दि.२६/१२/११ | मे. एन.एस. इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | मौजे चेना प्रभाग क्र. ७४ मधील बेलकरी पाडा व पाटील पाडा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे व गटारावर स्लॅब टाकणे. | रू.२५,००,०००/- | खासदार निधी | दि.२६/११/११ | मे. श्री बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर्स | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | घोडबंदर येथिल हटकेश ते पावर हाऊस रोडवरील उघाडीचे वाढीव बांधकाम करणे. | रु.१४,९९,२००/- | दुर्बल घटक निधी | दि.२६/११/११ | मे. साई कंन्स्ट्रक्शन | १२.00 % कमी दरान |

वरील काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग

गोणवारा प्राप्त दि. २८/११/२०११

[signature] २८/११/११

वेळ : १४:१५ वा.

स्थायी समिती गोणवारा
नोंद राजी. क्रं. १५.